सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०२४–२५/११८८ दिनांक : २८/०३/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग व प्रशाला, पुणे.

**विषय : DIPEX २०२५ या कार्यक्रमास भेट देणेबाबत...**
**संदर्भ क्र. : SRJ/DIP/2025/02/39 dated 26/03/2025**

महोदय/महोदया,

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १९८६ मध्ये स्थापना करण्यात आलेली DIPEX ही एक प्रतिष्ठित राज्यस्तरीय प्रदर्शनी आणि स्पर्धा आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र आणि गोव्यातील डिप्लोमा, डिग्री, आणि पोस्टग्रॅज्युएट अभियांत्रिक व कृषी शाखेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेली कार्यरत मॉडेल्स प्रदर्शित केली जातात. DIPEX चे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांना नाविण्यपूर्ण तांत्रिक प्रकल्प सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, युवा तंत्रज्ञांमध्ये उद्योजकतेची भावना निर्माण करणे, शिक्षणसंस्था, उद्योग आणि समाज यांच्यातील दरी कमी करणे सोबतच प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधण्याची प्रवृत्ती वाढवणे असे आहे.

DIPEX 2025 चे आयोजन COEP तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे येथे ०३ एप्रिल ते ०६ एप्रिल २०२५ दरम्यान होणार आहे. या चार दिवसीय प्रदर्शनात कृषी तंत्रज्ञान, संगणकीय बुध्दिमत्ता, संरक्षण आणि सायबर सुरक्षा, ऊर्जा व्यवस्थापन, औद्योगिक स्वयंचलन, आरोग्यसेवा तंत्रज्ञान, वाहतूक आणि गतिशीलता, शाश्वत नागरी पायाभूत सुविधा आणि सुरक्षा उपाय या विविध विषयांवर आधारित प्रकल्प प्रदर्शित केले जातील. ३४व्या डिपेक्स च्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सह–आयोजक आहे. या कार्यक्रमास आपले महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थामधील विद्यार्थ्यांनी भेट देणेबाबत सूचित केले आहे. या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत तसेच या प्रदर्शनास अधिकाधिक विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, कार्यक्रम अधिकारी यांनी सहभागी होऊन प्रदर्शनास भेट देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे हि विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

34
DIPEX 2025
# DIPEX 2025
A State Level Exhibition-cum-Competition of Working Models
I DIPEX, A-3, 1525, Suvidha Smita Apts., Sadashiv Peth, Pune 411030. I Email : dipex@srjan.org.in I 9423307822 I 8275518814

**Reception Committee**

**Patron**
**Dr. Pramod Chaudhari**
Chairman, Praj Ind. Ltd.
**Dr. Suresh Gosavi**
Vice Chancellor - SPPU
**Dr Sunil Bhirud**
Vice Chancellor - COEP Technological University

**Chairman**
**Dr. Prakash Dhoka**
Founder & MD
Indl. Metal Powder India Pvt. Ltd.

**Vice Chairman**
**Sanjay Inamdar**
Founder - Flucon
**Kailas Katkar**
MD - Quick Heal Technologies Ltd.

**Executive President**
**Pramod Kulkarni**

**Secretary**
**Presenjeet Fadnavis**
Secretary

**Members**
**Ankush Asabe**
CMD, Venkatesh Buildcon Pvt. Ltd.
**Bharat Gite**
MD & CEO,
Taural India Pvt. Ltd.
**Pro. Dr. Ravi Chitnis**
Vice Chancellor
MIT WPU
**Mrs. Alka karkare**
Joint MD - Enpro Industries Pvt. Ltd.
**Bharat Agarwal**
Managing Trustee - VIT
**Vikas Patil**
MD - Savi Infra Pvt Ltd.

**ABVP PUNE**
**Pro. Dr. Pragati Thakur**
President - ABVP Pune
**Harshwardhan Harpude**
Secretary - ABVP Pune

Outward No.: SRJ/DIP/2025/02/39 Date : 26/03/2025

मा. कुलगुरु यांचे कार्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 26 MAR 2025
आवक क्रमांक 1672
जावक दिनांक 26 MAR 2025

विद्यार्थी विकास मंडळ 2057 सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रति
कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून DIPEX 2025 या कार्यक्रमाला संलग्रित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट देण्यासाठी विनंतीपत्र पाठविणे बाबत.

महोदय,

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १९८६ मध्ये स्थापना करण्यात आलेली DIPEX, ही एक प्रतिष्ठित राज्यस्तरीय प्रदर्शनी आणि स्पर्धा आहे ज्यामध्ये महाराष्ट्र आणि गोव्यातील डिप्लोमा, डिग्री, आणि पोस्टग्रॅज्युएट अभियांत्रिक व कृषी शाखेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेली कार्यरत मॉडेल्स प्रदर्शित केली जातात. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) भारतातील प्रमुख विद्यार्थी संघटना आहे आणि जगातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना म्हणून ओळखली जाते. १९४९ मध्ये स्थापन झाल्यापासून, ABVP ने सतत विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि युवा शक्तीला रचनात्मक कार्यासाठी संघटित आणि मार्गदर्शन करण्याचे काम करत आहे.

DIPEX चे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण तांत्रिक प्रकल्प सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, युवा तंत्रज्ञांमध्ये उद्योजकतेची भावना निर्माण करणे, शिक्षणसंस्था, उद्योग आणि समाज यांच्यातील दरी कमी करणे सोबतच प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधण्याची प्रवृत्ती वाढवणे असे आहे.

DIPEX 2025 चे आयोजन COEP तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे येथे 3 एप्रिल ते 6 एप्रिल 2025 दरम्यान होणार आहे. या चार दिवसीय प्रदर्शनात कृषी तंत्रज्ञान, संगणकीय बुद्धिमत्ता, संरक्षण आणि सायबर सुरक्षा, ऊर्जा व्यवस्थापन, औद्योगिक स्वयंचलन, आरोग्यसेवा तंत्रज्ञान, वाहतूक आणि गतिशीलता, शाश्वत नागरी पायाभूत सुविधा आणि सुरक्षा उपाय या विविध विषयांवर आधारित प्रकल्प प्रदर्शित केले जातील. यावर्षी 2000 पेक्षा जास्त प्रकल्पांची नोंदणी झाली आहे, त्यापैकी सुमारे 400 प्रकल्प हे DIPEX 2025 मध्ये प्रदर्शित करण्यासाठी निवडले जाणार आहेत. अशा प्रकारच्या प्रदर्शनामुळे अभियांत्रिक विद्यार्थ्यांना उद्योगाशी संबंधित माहिती मिळवण्यास तसेच ज्ञान मिळवण्यास उत्कृष्ट संधी मिळणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये नेटवर्क तयार करण्यास देखील मदत होईल.

३४व्या डिपेक्स च्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सह-आयोजक असल्यामुळे आपल्याशी संलग्र असणाऱ्या सर्व महाविद्यालयांनी डिपेक्स २०२५ ला भेट द्यावी असे परिपत्रक विद्यापीठाकडून काढण्यात यावे अशी विनंती.

| | | |
|---|---|---|
| **श्री . राजेंद्र हिरेमठ.** | **श्री. प्रमोद कुलकर्णी** | **श्री. प्रसेनजीत फडणवीस** |
| **विश्वस्त,** | **कार्याध्यक्ष ,** | **सचिव,** |
| **सृजन ट्रस्ट** | **स्वागत समिती** | **स्वागत समिती** |

In Association with
ABVP SRIJAN सृजन

DIR BSD
28/3